Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 23RD DECEMBER 1897.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट जास्त सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट जास्त सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविलें आहे :—

१. (१) या आक्टास सन १८९७ चा पिट्रोलियम आक्ट असें ह्मणावें; आणि — लहान सरनामा व सुरुवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट याच्या ३ ऱ्या कलमांत, रकम (१) हिजबद्दल खालील रकम दाखल केली पाहिजे. ती येणेंप्रमाणें :— — सन १८८६ चा आक्ट १२, याच्या ३ ऱ्या कलमांत "पिट्रोलियम" याची नवीन व्याख्या दाखल करणें.

'(१) "पिट्रोलियम" या शब्दांत—

(अ) राकआइल, रंगूनआइल, बर्माआइल, केरोसीन, प्याराफीनआइल, मिनरलआइल, पिट्रोलीन, ग्यासोलीन, बेन्झोल, बेन्झोलीन व बेन्झीन, या नांवांनीं जे प्रवाही पदार्थ साधारणपणें माहीत आहेत त्यांचा,

(ब) पिट्रोलियम, कोल [विलायती कोळसा], शिस्ट, शेळ, पीट अगर दुसरा कोणताही बिट्यूमनी पदार्थ यापासून केलेला, किंवा पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेल्या कोणत्याही पदार्थापासून केलेला कोणताही लवकर पेटणारा प्रवाही पदार्थ याचा, आणि

(क) सदरीं सांगितलेल्या प्रवाही पदार्थांपैकीं कोणत्याही पदार्थाचें दुसऱ्या पदार्थांशीं जें कोणतेंही प्रवाही किंवा चिकट मिश्रण केलें असेल त्याचा,

समावेश होतो :

परंतु त्यांत, ज्या कोणत्याही तेलाचा उपयोग प्रायः ओंगण करण्याच्या कामासाठीं करण्यांत येत असेल आणि ज्याचा ज्वलनबिंदु फारन्हैटच्या उष्णतामापक यंत्राच्या दोनशें अंशांइतका किंवा त्यांच्यावर असेल त्या तेलाचा समावेश होत नाहीं:'.

सन १८८६ चा आक्ट १२, याच्या ४ थ्या कलमास नवीन पोटकलम जोडणें.

३. सदरहू आक्टाच्या ४ थ्या कलमास खालील पोटकलम जोडलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

"(३) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन, या आक्टास जोडलेलें परिशिष्ट, तपासणीचे नवीन प्रकार फर्मावून किंवा त्यांमध्यें फेरबदल करून, आणि तें तयार करण्याकरितां व उपयोगांत आणण्याकरितां समजुती फर्मावून, फिरविण्याचा किंवा वाढविण्याचा अधिकार आहे; आणि या आक्टांत त्या परिशिष्टावर दिलेले सर्व हवाले, तें फिरविलें किंवा वाढविलें जाईल तेव्हां, याप्रमाणें फिरविलेल्या किंवा वाढविलेल्या परिशिष्टावर त्या त्या वेळापुरते दिले आहेत असें समजावें."

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

ज्यां रंगांमध्यें, व्हार्निसांमध्यें व त्यांसारख्या इतर पदार्थांमध्यें लवकर पेट घेणारें द्रव्य असतें असे रंग, व्हार्निसें व त्यांसारखे इतर पदार्थ आणणें, कवज्यांत ठेवणें किंवा एका जागेहून दुसऱ्या जागीं पाठविणें यांच्या बाबतींत पूर्वोपाय योजण्याची जरूरी आहे असें हिंदुस्थान सरकारच्या नजरेस आणलेलें असून, त्या विषयावर मलिका मआझमा यांच्या स्टेट सेक्रेटरींबरोबर पत्रव्यवहार झालेला आहे. ह्मणून, आतां या मसुद्याच्या २ ऱ्या कलमावरून असें योजिलें आहे कीं, सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२) याचे ठराव सदरहू पदार्थांस लागू करण्याकरितां, "पिट्रोलियम" या शब्दाच्या व्याख्येंत अगोदर सांगितलेल्या प्रवाही पदार्थांपैकीं कोणत्याही पदार्थाचें दुसऱ्या पदार्थाशीं कोणतेंही प्रवाही किंवा चिकट मिश्रण केलें असेल त्याचा समावेश होई अशी त्या व्याख्येची व्याप्ति वाढवावी. असें दिसून येईल कीं, ही संधि साधून सदरील सगळ्या व्याख्येची रचना सुधारली आहे, परंतु महत्त्वाचा फेरफार झटला ह्मणजे, जे शब्द सोईकरितां खालीं रेघ मारून दाखल केले काहेत तेवढाच आहे.

२. अनुभवावरून आणखी असें दिसून आलें आहे कीं, सदरहू आक्टाच्या परिशिष्टांत सांगितलेल्या तपासणीच्या प्रकारांखेरीज व यंत्राखेरीज दुसरे तपासणीचे प्रकार व यंत्र असून, कित्येक बाबतींत त्यांचा उपयोग केला असतां विशेष चांगलें होईल असें दिसतें. ह्मणून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांस वेळोवेळीं, इंडिया गॅझेटांत जाहिरनामा देऊन, त्या परिशिष्टांत फेरफार करतां किंवा जास्त मजकूर घालतां यावा या हेतूनें, प्रस्तुत मसुद्याच्या ३ ऱ्या कलमांत सुचविल्याप्रमाणें, ४ थ्या कलमांत जास्त मजकूर घालण्याचें योजिलें आहे.

तारीख २७ माहे अक्टोबर, सन १८९७. (सही.) सी. एम्. रिव्हाझ.

(True translation)

M. A. BAIG,

Oriental Translator to Government.

---

## हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा हा परमुलखी अपराधांच्या संबंधानें सुधारण्याबाबदच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा हा परमुलखी अपराधांच्या संबंधानें सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून येणेंप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. (१) या आक्टास, सन १८९८ चा हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा सुधारण्याबाबद आक्ट, असें ह्मणावें ; आणि (लहान सरनामा व सुरुवात.)

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा, याचें ४ थें कलम यावरून रद्द केलें आहे; आणि त्याबद्दल खालील कलम दाखल केलें आहे. तें येणेंप्रमाणें :— (सन १८६० च्या ४५ व्या आक्टाच्या ४ थ्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.)

"४. या कायद्याचे ठराव— (परमुलखी अपराधांस हा कायदा लागू होणें.)

(१) राणीसाहेबांच्या हिंदुस्तानांतील कोणत्याही देशी रयतेनें, हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखाच्या बाहेरील व पलीकडील कोणत्याही जागीं ;

(२) दुसऱ्या कोणत्याही ब्रिटिश रयतेनें, हिंदुस्तानांतील कोणत्याही देशी राजाच्या किंवा रजवाड्याच्या मुलखांमध्यें ;

(३) राणीसाहेबांच्या कोणत्याही नौकरानें, मग तो ब्रिटिश रयत असो किंवा नसो, हिंदुस्तानांतील कोणत्याही देशी राजाच्या किंवा रजवाड्याच्या मुलखांमध्यें,

केलेल्या कोणत्याही अपराधास लागू आहेत.

**व्याख्या.**—या कलमांतील "अपराध" या शब्दांत, जें जें कृत्य हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत केलें असतां त्याबद्दल या कायद्याअन्वयें शिक्षा करतां येईल, त्या त्या, हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखाबाहेर केलेल्या कृत्याचा समावेश होतो.

### उदाहरणें.

(अ) अ हा मजूर हिंदुस्तानांतील देशी रयत असून, उगंडामध्यें खून करतो. तर तो हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत ज्या कोणत्याही जागीं सांपडेल तेथें त्याचा इनसाफ करतां व त्यावर खुनाच्या शाबितीचा ठराव करतां येईल.

(ब) ब हा युरोपियन ब्रिटिश रयत असून, अफगाण सरहद्दीच्या ब्रिटिश बाजूवर तेथील लोकांच्या मुलखांत जबरीचा संभोग करतो. तर तो हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत ज्या कोणत्याही जागीं सांपडेल तेथें त्याचा इनसाफ करतां व त्यावर जबरीच्या संभोगाच्या शाबितीचा ठराव करतां येईल.

(क) क हा परमुलखी मनुष्य पंजाब सरकारच्या नौकरींत असून, ह्विदमध्यें खून करतो. तर तो हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत ज्या कोणत्याही जागीं सांपडेल तेथें त्याचा इनसाफ करतां व त्यावर खुनाच्या शाबितीचा ठराव करतां येईल.

(ड) ड हा ब्रिटिश रयत इंदुरांत राहत असून, इ याला मुंबईंत खून करण्यास उत्तेजन देतो. तर खून करण्याविषयीं साह्य केल्याचा गुन्हा डकडे आहे.

हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलुखाबाहेर अपराध करण्याविषयीं त्या मुलुखांत साह्य करणें.

३. हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा, याच्या १०८ व्या कलमानंतर खालील कलम जास्त दाखल केलें पाहिजे. तें येणेंप्रमाणें :—

हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखाबाहेर अपराध करण्याविषयीं त्या मुलखांत साह्य करणें.

"१०८ अ. जें कोणतेंही कृत्य हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत केलें असतां अपराध होईल, तें त्या मुलखाच्या बाहेर व पलीकडे करण्याविषयीं जो मनुष्य त्या मुलखांत साह्य करतो, तो या कायद्याच्या अर्थाप्रमाणें अपराध करण्याविषयीं साह्य करतो असें समजावें.

उदाहरण.

अ हा हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखांत असून, गोव्यांत असणाऱ्या व या परमुलखी मनुष्यास गोव्यांत खून करण्याविषयीं उत्तेजन देतो. तर खून करण्याविषयीं साह्य केल्याचा गुन्हा अकडे आहे."

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा हा, सन १८३३ चा हिंदुस्तानच्या राज्यव्यवस्थेबावद आक्ट ( ३ व ४ विलि. ४, चा. ८५), याच्या ४३ व्या कलमांत दिलेल्या अधिकारांअन्वयें सन १८६० यासालीं ठरविण्यांत आला.—राणी विरुद्ध एल्म्स्टोन ( १८७८ ), ७ मुंबई, क्रि. के., पृष्ठ १००, पहा.

२. सदरील तारखेनंतर पार्लमेंट सभेनें हिंदुस्तानच्या कायदे करणाऱ्या मंडळीस, परमुलखी अपराधांबद्दल कायदा करण्याचे अनेक अधिकार दिलेले आहेत, परंतु हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा यांत तदनुसार कोणतीही सुधारणा केलेली नाहीं. या अधिकारांचा उपयोग, सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत व अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयीं आक्ट ( सन १८७९ चा २१ ) याच्या ८ व्या कलमांत, जरी पूर्णपणें नाहीं तरी, बऱ्याच अंशीं करून घेतलेला आहे. हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याचा अमल परमुलखाच्या संबंधानें कोठवर होतो हें, खुद्द त्या कायद्याच्याच योगें निर्दिष्ट करणें इष्ट दिसतें. हल्लीं हें काम केवळ तुटक व भ्रामक अशा रीतीनें केलेलें आहे, आणि ज्या अर्थीं केवळ एकीकरणापेक्षां कांहीं विशेष गोष्टीची अपेक्षा आहे, त्याअर्थीं प्रस्तुतचा मसुदा तयार केला आहे. सदरहू कायदा सुधारण्याकरितां वेळोवेळीं ठरविलेले अनेक कायदे पुढें एकत्र करण्याचें योजिलें आहे, परंतु सुधारणा करणें असेल ती एकीकरणापासून भिन्न ठेवणें विशेष चांगलें आहे.

३. अपराधाच्या स्थानाच्या संबंधानें जें इंग्लंड देशांत मत आहे तें केवळ तेथील सामान्य कायद्याचें मत आहे, व तें फौजदारी कामांत तकरार करण्याबावदच्या जुन्या नियमांतून उत्पन्न झालें असावें असा संभव दिसतो. हें मत इतर राष्ट्रांस मान्य झालेलें नाहीं. हालचा इंटर्न्याशनल लॉ, आवृत्ति ३ री, पृष्ठ २०६, आणि राणी विरुद्ध मुर्गाचेटी (१८८१), या खटल्यांतील जस्टिस वेस्ट यांचा फैसला, इं. लॉ. रि. ९ मुंबई, पृष्ठ ३६२, हे पहा. हिंदुस्थानच्या स्थितीकडे लक्ष देऊन, पार्लमेंट सभेनें इंग्लंड देशाचा नियम सोडून दिला, आणि हिंदुस्थानच्या कायदे करणाऱ्या मंडळीस, परमुलखी अपराधांच्या संबंधानें कित्येक बाबतींत तजवीज करण्याचा अधिकार दिला. हा अधिकार पूर्णपणें चालवावा हें बरोबर दिसतें, व हा हेतु प्रस्तुत मसुद्याच्या योगें सिद्धीस जाणार आहे. तथापि कांहीं विसंगतपणा राहीलच, परंतु तो फक्त पार्लमेंट सभाच जास्त कायदा करून दूर करूं शकेल.

## कलमांवर टिपणें.

**कलम २.**—या कलमावरून, सदरहू कायद्याचें ४ थें कलम रद्द करून त्याच्याबदला एक नवीन कलम दाखल करण्याचें योजिलें आहे.

सदरील नव्या कलमाची रकम ( १ ) हींतील मजकूर सन १८६९ चा हिंदुस्तानांतील कौन्सिलांबाबद आक्ट (३२ व ३३ व्हिक्., चा. ९८), याच्या १ ल्या कलमाप्रमाणें असून तो, सन १८७९ चा परमुलकांतील हुकुमत व अपराध्यांस स्वाधीन करणें यांविषयीं आक्ट ( सन १८७९ चा २१ ), याचें कलम ८ ( १ ) याशीं मिळता आहे.

रकम (२) हिजमध्यें "ब्रिटिश रयत" या शब्दांचा उपयोग करून ती, सन १८६१ चा हिंदुस्थानच्या राज्य-व्यवस्थेबाबद आक्ट (२८ व २९ व्हिक्., चा. ९७), याच्या १ ल्या कलमांतील मजकुराप्रमाणें केलेली आहे, आणि तिजवरून, सन १८७९ च्या २१ व्या आक्टाचें कलम ८ (२) हें फक्त युरोपियन ब्रिटिश रयतेसच लागू आहे त्याच्या अमलाची व्याप्ति वाढणार आहे. जी रयत सदरहू आक्टांत व्याख्या दिल्याप्रमाणें युरोपियन ब्रिटिश रयत नव्हे, व हिंदुस्तानांतील देशी रयतही नव्हे, अशी पुष्कळ ब्रिटिश रयत आहे; उदाहरणार्थ, सिंगापूर, तास्मीनियन व स्ट्रेट्स सेटल्मेंट येथचे रहिवासी, हे लोक.

रकम (३) हिच्या संबंधानें पाहतां असें आहे कीं, सन १८६१ चा हिंदुस्तानांतील कौन्सिलांबाबद आक्ट (२४ व २५ व्हिक्., चा. ६७), याच्या २२ व्या कलमावरून हिंदुस्थानच्या कायदे करणाऱ्या मंडळीस, "राणीसाहेबांशीं सख्यसंबंधानें वागणाऱ्या राजांच्या व संस्थानांच्या अमलांतील मुलखांमधल्या हिंदुस्तान सरकारच्या सर्व नौकरांबद्दल" कायदे करण्याचा अधिकार दिलेला आहे. हिंदुस्तानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयींचा कायदा याच्या ४ थ्या कलमावरून त्या कायद्याचे ठराव, "मागें ईस्ट इंडिया कंपनीशीं तह किंवा ठराव झाल्यामुळें किंवा राणीसाहेबांच्या नांवानें कोणी इंडिया सरकारानें तह किंवा ठराव केल्यामुळें, ज्या राजाचा किंवा ज्या संस्थानाचा राणीसाहेबांशीं सख्यसंबंध झाला असेल, त्या राजाच्या किंवा त्या संस्थानाच्या अमलांतील मुलखामधल्या" राणीसाहेबांच्या प्रत्येक नोकरास लागू केले आहेत. सदरहू हिंदुस्थानचा आक्ट व इंग्लंड देशाचा स्टाट्यूट या दोन्हीमध्यें, जे सरकारी नोकर ब्रिटिश रयत आहेत व जे तशी रयत नाहींत यांमध्यें मुळींच भेद केलेला नाहीं. ह्मणून, बादशाहीण विरुद्ध नत्थुराय (१८९१, इं. लॉ. रि. १६ मुंबई १७८, या खटल्यांतील निकालाचा निषेध करण्याकरितां सदरहू मसुद्यांत "मग तो ब्रिटिश रयत असो किंवा नसो" हे शब्द घातले आहेत; कारण, त्या खटल्यांत असें प्रतिपादन करण्यांत आलें होतें कीं, जो सरकारी नोकर देशी संस्थानची रयत असेल त्याचा, हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखाबाहेर केलेल्या अपराधाबद्दल इनसाफ त्या मुलखांत करवां येणार नाहीं. सदरील फेरफारामुळें कराव्या लागणाऱ्या सुधारणा, फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयींच्या कायद्यांत करण्यांत येतील.

"हिंदुस्थान" या संज्ञेची व्याख्या, सन १८९७ चा सामान्य कलमांचा आक्ट (सन १८९७ चा १०), कलम ३ (२७), यांत केलेली असून ती, सन १८८९ चा अर्थाबाबदचा आक्ट (५२ व ५३ व्हिक्., चा. ६३), यांत दिलेल्या व्याख्येशीं मिळते.

कलम ३.—हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखामधल्या कोणी मनुष्यानें गोव्यांत खून करण्याविषयीं कोणा पोर्चुगीज मनुष्यास उत्तेजन दिलें असतां, त्याकडे कोणताच अपराध केल्याचा गुन्हा येत नाहीं, (बादशाहीण विरुद्ध गणपतराव (१८९४), इं. लॉ. रि. १९ मुंबई १०५, हा खटला पाहा), अशा अर्थाच्या मुंबई हाय कोर्टानें केलेल्या एका निकालास उद्देशून मुंबई सरकारानें एक सूचना केली, ती अमलांत आणण्याच्या इरादानें हें कलम दाखल केलें आहे. जर हा खुनी हिंदुस्तानांतील देशी रयत असता तर हल्लींचा कायदा त्याला लागू पडता असें वाटतें, परंतु या मुद्यावर चर्चा झाली नाहीं. हिंदुस्तानच्या कायदे करणाऱ्या मंडळीस हिंदुस्तानांतील ब्रिटिश सरकारच्या अमलांतील मुलखामधल्या सर्व मनुष्यांकरितां कायदे करण्याचा अधिकार आहे, मग त्या मुलखानें गुन्ह्यास उत्तेजन देणारांचें आश्रयस्थान कां बनावें याला मुळींच कारण दिसत नाहीं.

तारीख ७ माहे आक्टोबर, १८९७. एम्. डी. चामर्स.

(True translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.